# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई

## मागासवर्गीय पदांचे भरती अंतर्गत वर्ग-४ मधील शिपाई/पहारेकरी पदासाठी भरती प्रक्रिया

दिनांक ६.१०.२०१३ वेळ सकाळी ११.०० ते १.०० एकूण गुण - १००

सुचना : १) प्रश्नपत्रिकेवर परीक्षार्थींनी आपला बैठक क्रमांक लिहावा

२) परीक्षेचा वेळ संपल्यावर परीक्षार्थींनी आपली प्रश्नपत्रिका पर्यवेक्षकाकडे द्यावी.

प्रश्नपत्रिका क्रमांक : ---3550 बैठक क्रमांक:

प्र.क्र. १ शिवरायांचा जन्म पुणे जिल्हयातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. सदर किल्ला कोणत्या तालुक्यात आहे?
(अ) पुरंदर (ब) जुन्नर (क) वेल्हे (ड) भोर

प्र.क्र.२ संत नामदेव हे कोणत्या गावचे राहणारे होते?
(अ) देहू (ब) नरसी (क) आळंदी (ड) आपेगाव

प्र.क्र. ३ श्री चक्रधर स्वामी यांनी स्थापन केलेल्या पंथाचे नाव काय?
(अ) वारकरी पंथ (ब) राधास्वामी पंथ (क) महानुभाव पंथ (ड) वैष्णव पंथ

प्र.क्र.४ खालीलपैकी कोणती जोडी चूक आहे.
(अ) अहमदनगर सुलतान - फत्तेखान (ब) विजयनगरचा सम्राट - कृष्णदेवराय
(क) विजापूरचा सुलतान - आदिलशाह (ड) मुघल शहेनशहा - शहाजहान

प्र.क्र.५ भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांनी कोणत्या ब्रिटीश अधिकाऱ्याची हत्या केली?
(अ) स्कॉट (ब) जॅक्सन (क) सायमन (ड) सॉण्डर्स

प्र.क्र.६ दोन सागरांना जोडणाऱ्या सागरी जलाच्या अरुंद भागास काय म्हणतात?
(अ) आखात (ब) उपसागर (क) सामुद्रधुनी (ड) सरोवर

प्र.क्र.७ सातपुडा पर्वतातील सर्वात उंच शिखराचे नाव काय?
(अ) कळसुबाई (ब) अस्तंभा (क) तोरणामाळ (ड) म्हैसमाळ

प्र.क्र.८ सातपुडा पर्वत आणि सातमाळा - अजिंठा डोंगररांगाच्या दरम्यान कोणत्या नदीचे खोरे आहे?
(अ) गोदावरी (ब) तापी (क) भीमा (ड) नर्मदा

प्र.क्र.९ महाराष्ट्रात सर्वात लांब व प्रमुख नदी कोणती?
(अ) वैनगंगा (ब) कृष्णा (क) गोदावरी (ड) इंद्रावती

प्र.क्र.१० महाराष्ट्रातील पाणीपुरवठयाचे प्रमुख साधन कोणते ?
(अ) तलाव (ब) कूपनलिका (क) विहिर (ड) नदी

प्र.क्र.११ महाराष्ट्राचा राज्यप्राणी कोणता?
(अ) मोर (ब) हरियाल (क) पट्टेरी वाघ (ड) शेकरु

प्र.क्र.१२ पुढीलपैकी कोणती जोडी चूक आहे?
(अ) सदाहरीत वने - जांभूळ (ब) निमसदाहरीत वने - आंबा
(क) पानझडी वने - खैर (ड) झुडपी वने - बाभूळ

प्र.क्र.१३ पुढीलपैकी कोणते जलविद्युत केंद्र नाही?
(अ) खापरखेडा (ब) भिवपुरी (क) खोपोली (ड) भिरा

प्र.क्र.१४ पुढीलपैकी कोणता आंतरराष्ट्रीय विमानतळ नाही?
(अ) नाशिक (ब) पुणे (क) नागपूर (ड) औरंगाबाद

प्र.क्र.१५ कोणत्या शहरानजीक मोझरी येथे संत तुकडोजी महाराजांची समाधी आहे?
(अ) नाशिक (ब) अमरावती (क) औरंगाबाद (ड) चंद्रपूर

प्र.क्र.१६ माळढोक पक्षी अभयारण्याची व्याप्ती पुढीलपैकी कोणत्या जिल्हयामध्ये आहे?
(अ) अहमदनगर व सोलापूर (ब) कोल्हापूर व सोलापूर
(क) पुणे व सोलापूर (ड) अहमदनगर व नाशिक

प्र.क्र.१७ कोरकू ही आदिवासी जमात खालील कोणत्या जिल्हयात प्रामुख्याने आढळून येते?
(अ) गडचिरोली (ब) अमरावती (क) यवतमाळ (ड) परभणी

प्र.क्र.१८ इ.स.वी.सनाच्या संख्येस कितीने नि:शेष भाग गेल्यास ते वर्ष लीप वर्ष मानले जाते?
(अ) तीने (ब) पाच (क) चार (ड) सहा

प्र.क्र.१९ तांबे आणि कथील यांचे रस एकत्र करुन बनवलेल्या मिश्रधातूला काय म्हणतात?
(अ) स्टील (ब) कांस्य (क) पितळ (ड) लोखंड

प्र.क्र.२० दगडी हत्यारे तयार करुन माणसाने प्रगतीचे पहिले पाऊल टाकले, या काळाचा उल्लेख कोणत्या नावाने केला जातो?
(अ) सुवर्णयुग (ब) द्वापारयुग (क) अश्मयुग (ड) त्रेतायुग

प्र.क्र.२१ कडधान्यांना मोड आणल्यास त्यात कोणते जीवनसत्व तयार होते?
(अ) बी (ब) सी (क) डी (ड) के

प्र.क्र.२२ पुढीलपैकी कोणता अनैच्छिक स्नायू नाही?
(अ) जठर (ब) आतडे (क) पाय (ड) हृदय

प्र.क्र.२३ पुढीलपैकी कोणत्या प्राण्यास आवाजाच्या दिशेने बाहयकर्ण हलविता येत नाहीत?
(अ) मानव (ब) बैल (क) कुत्रा (ड) मांजर

प्र.क्र.२४ माऊंटमेरी हे धार्मिक स्थळ कोणत्या शहरात आहे?
(अ) ठाणे (ब) बृहन्मुंबई (क) सातारा (ड) पनवेल

प्र.क्र.२५ मुंबई - ठाणे शिधावाटप क्षेत्रात किती परिमंडळे आहेत?
(अ) चार (ब) पाच (क) सहा (ड) सात

प्र.क्र.२६ महाराष्ट्राचा बराचसा भाग कोणत्या अग्निज खडकाचा बनला आहे?
(अ) क्रोमाईट (ब) बेसाल्ट (क) डोलोमाईट (ड) मँगनीज

प्र.क्र.२७ खालीलपैकी कोणते अपारंपारिक उर्जा साधन नाही?
(अ) सूर्यकिरण (ब) वारा (क) सागरी लाटा (ड) दगडी कोळसा

प्र.क्र.२८ खालील शब्दसमूहासाठी योग्य असणारा शब्द कोणता?
कर्तव्याकडे पाठ फिरवणारा ------------
(अ) कृतकृत्य (ब) कर्तव्यनिष्ठ (क) कर्तव्यपराड्.मुख (ड) कर्तव्यदक्ष

प्र.क्र.२९ खालील शब्दासाठी कोणता शब्दसमूह निवडाल?
मचाण ---------
(अ) चिरेबंद भिंत (ब) शिकारीसाठी बांधलेला माळा
(क) किल्ल्याभोवतीचा तट (ड) झोपाळा

प्र.क्र.३० खालीलपैकी कोणती जोडी चूक आहे?
(अ) म्हशीचे पिल्लू - वासरु (ब) घोडयाचे पिल्लू - शिंगरु
(क) शेळीचे पिल्लू - करडू (ड) मेंढीचे पिल्लू - कोकरु

प्र.क्र.३१ पुढीलपैकी कोणता जिल्हा हळदीच्या उत्पादन व व्यापारासाठी प्रसिध्द आहे?
(अ) हिंगोली (ब) सांगली (क) धुळे (ड) अकोला

प्र.क्र.३२ ३५/८ या अपूर्णांकाचा पूर्णांकयुक्त अपूर्णांक कोणता?
(अ) ४ ८/३ (ब) ४ ३/८ (क) ४ ४/८ (ड) ५ ३/८

प्र.क्र.३३ एका कारखान्यात दररोज ३०० बाहुल्या तयार केल्या जातात. एका वर्षी प्रत्येक चौमाहीत ८० दिवस कारखाना चालू होता, तर त्या वर्षी किती बाहुल्या तयार करण्यात आल्या?
(अ) ८००० (ब) १२००० (क) २४००० (ड) ७२०००

प्र.क्र.३४ एका संख्येला ९ ने गुणण्याऐवजी ६ ने गुणले असता गुणाकार हा मूळ गुणाकारापेक्षा ६० ने कमी आला, तर ती संख्या कोणती ?
(अ) ९ (ब) ६ (क) ३ (ड) २०

प्र.क्र.३५ ज्यात १ हा अंक नाही अशा दोन अंकी संख्या किती?
(अ) ८१ (ब) ८० (क) ७५ (ड) ७२

प्र.क्र.३६ १ तास १२ मिनिटे २३ सेकंदांची एकूण सेंकद किती?
(अ) ४३३५ (ब) ४३१३ (क) ४३४३ (ड) ७४३

प्र.क्र.३७ पृथ्वीवर ऋतू का निर्माण होतात?
(अ) सूर्योदय व सूर्यास्तामुळे (ब) पृथ्वीच्या कललेल्या आसामुळे
(क) सूर्यप्रकाशामुळे (ड) वारा वाहत असल्यामुळे

प्र.क्र.३८ खतनिर्मितीच्या कामात कोणता पदार्थ वापरला जातो?
(अ) नॅफ्था (ब) दगडी कोळसा (क)रॉकेल (ड) डांबर

प्र.क्र.३९ 'व्यवसाय' या शब्दाशी संबंधित नसलेला शब्द निवडा -------------
(अ) Carpenter (ब) Father (क) Teacher (ड) Painter

प्र.क्र.४० घराची सफाई करण्याकरीता लागणाऱ्या वस्तूंच्या यादीत एका योग्य शब्दाची भर घाला.
Broom, Water, Soap, --------
(अ) Towel (ब) Brush (क) Tap (ड) Hammer

प्र.क्र.४१ खालीलपैकी विनंती दर्शविणारे वाक्य कोणते?

(अ) Why dont you lend me your cycle?

(ब) Give your cycle.

(क) Would you lend me your cycle?

(ड) You should lend your cycle to me.

प्र.क्र.४२ खालील वाक्यातून विशेषण शोधून काढा -------------

He is an old man

(अ) an (ब) man (क) He (ड) old

प्र.क्र.४३ क्रियापदाचे योग्य रुप लिहून खालील वाक्य पूर्ण करा.

The sparrows ------------- grains.

(अ) is eat (ब) eats (क) eat (ड) eating

प्र.क्र.४४ १४२ व ५८ यांच्या बेरजेला त्यांच्या वजाबाकीने गुणले असता येणारा गुणाकार किती?

(अ) १६८०० (ब) ११६०० (क) १६२०० (ड) ११४००

प्र.क्र.४५ मुंबई-नाशिक-आग्रा या राष्ट्रीय महामार्गावर आपल्या राज्यातील महत्वाचे ठिकाण कोणते?

(अ) धुळे (ब) नांदेड (क) सोलापूर (ड) अहमदनगर

प्र.क्र.४६ मुंबईजवळील न्हावाशेवा येथील नवीन बंदराला कोणाचे नाव देण्यात आले आहे?

(अ) मोतीलाल नेहरु (ब) जवाहरलाल नेहरु (क) कान्होजी आंग्रे (ड) छत्रपती शिवाजी

प्र.क्र.४७ पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा ---------

(अ) साधूंचा समूह - झुंड (ब) फुलांचा समूह - गुच्छ

(क) फुलझाडांचा समूह - ताटवा (ड) बांबूंचा समूह - बेट

प्र.क्र.४८ खालील रिकाम्या जागेत कोणता आलंकारिक शब्द योग्य राहील?

सौरभचे वडील फार तापट, जणू

(अ) कर्णाचा अवतार (ब) सांबाचा अवतार (क) जमदग्नीचा अवतार (ड) विष्णूचा अवतार

प्र.क्र.४९ गांधीजींचा जन्म गुजराथमधील कोणत्या शहरात झाला?

(अ) सुरत (ब) आणंद (क) पोरबंदर (ड) दमण

प्र.क्र.५० सुभाषचंद्र बोस यांनी 'इंडियन नॅशनल आर्मी ' ची स्थापना कोठे केली?

(अ) कोलकाता (ब) रंगून (क) सिंगापूर (ड) गुवाहाटी